# <u>महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११००४.</u>

**विषय** : उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रुवारी-मार्च २०२० लेखी परीक्षा वेळापत्रकाबाबत...

# प्र क ट न

---

फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी परीक्षांचे संभाव्य वेळापत्रके मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर दिनांक १५/१०/२०१९ पासून उपलब्ध करून देण्यात आलेली असून सदर वेळापत्रकांबाबत सुचना असल्यास मंडळाकडे १५ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात मागविण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार संघटना, पालक, शिक्षक यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचनांचे अवलोकन करून, **<u>इ.१२वी व इ.१०वी ची संभाव्य वेळापत्रकेच अंतिम करण्यात आलेली आहेत.</u>** अंतिम वेळापत्रकानुसार लेखी परीक्षा खालील कालावधीत आयोजित केलेल्या आहेत.

| अ.क्र. | तपशील | लेखी परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| १) | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (सर्वसाधारण व द्विलक्षी विषय) व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम | मंगळवार दि. १८ फेब्रुवारी २०२० ते बुधवार दि. १८ मार्च २०२० |
| २) | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (पुनर्रचित अभ्यासक्रम) | मंगळवार दि. ०३ मार्च २०२० ते सोमवार दि. २३ मार्च २०२० |

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेली दिनांकनिहाय सविस्तर अंतिम वेळापत्रके मंडळाच्या अधिकृत www.mahahsscboard.maharashtra.gov.in संकेतस्थळावर दिनांक १८/११/२०१९ पासून उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

<u>मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे छापील स्वरुपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरून परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सअॅप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये.</u>

<u>प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी, तोंडी परीक्षा व अन्य विषयांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे परीक्षेपूर्वी मंडळामार्फत शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांना कळविण्यात येईल.</u>

सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १६/११/२०१९
१८

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे-४